The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# “संत साहित्यातील कवयित्री संत मुक्ताबाई”

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**मराठी विभाग, श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर**

**सारांश:** मराठी गद्य कवयित्री म्हणून पहिला मान मिळाला तो महा नुभाव पंथातील महदंबा त्यानंतर संत कवयित्री म्हणून समोर येतात त्या म्हणजे मुक्ताबाई,जनाबाई,कान्होपात्रा, तुकबाची शिष्या बहिणाबाई, समर्थांची शिष्या वेणाबाई या सर्व प्रमुख संत स्त्रिया असल्या तरी त्या कुठल्यातरी संप्रदायाच्या अनुयायी आहेत. त्यांचा कालखंड जरी भिन्न असला तरी त्याची जाणीव ही एकच होती ती म्हणजे भक्तीची. सर्व संत कवयित्री सर्वसामान्य आहेत. त्यांना कोणतीही श्रेष्ठ अशी परंपरा नाही किंवा खूप संपत्ती प्रांतांचे सुख नाही, प्रतिष्ठा नाही, केवळ कष्ट आणि हाल अपेष्टा त्यांच्या नशिबी आहेत. पण या सर्वांजवळ एकच खूप मोठी शक्ती होती, ती म्हणजे भक्तीची आणि या भक्तीच्या बळावर वारकरी स्त्री संतांनी आपले नाते विठ्ठलाची जोडलेले दिसते. त्यांना त्यांच्या जीवनाला सार्थ करणारा असा विठ्ठल होता. विठ्ठलाची लाभलेली अखंड गुरुकृपा आणि संतांचा सहवास यातच त्यांची भक्ती फुलत गेली बहरत गेली, आणि यातूनच संत कवयित्रींच्या काव्याला वाचा फुटली. त्यातच  त्यांचे वेगळेपण दिसून आले.

**मुख्य शब्द:**

महाराष्ट्रात संत साहित्याचा अभ्यास करत असताना असे दिसून येते की, स्त्रियांच्या परिचयाचा प्रारंभ हा महानुभाव पंथातील संत स्त्रियांपासून झाला. मध्ययुगीन संत कवयित्रींचा विचार केला असता असे दिसते की, अधिक कवयित्री ह्या यादवकाळात झाल्या.महानुभाव पंथातील महदंबा ही वारकरी संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई,सोयराबाई,निर्मला, राजाई, गोणाई, कान्होपात्रा इत्यादी संत स्त्रिया झालेल्या दिसून येतात.त्यानंतर हीच परंपरा संत बहिणाबाई वेणाबाई यांच्या रूपाने पुढे येताना दिसते.

संत कवयित्रींच्या साहित्याचा विचार करत असताना असे लक्षात येते की, प्रत्येक कवयित्री ही त्या कालखंडातील असलेल्या भाषेचा प्रांताचा रचनाशैलीचा व तिच्या साहित्याचा आविष्कार करत असते. व त्या प्रत्येकीची पद्धत वेगळी जाणवते.परंतु सर्व संत कवयित्रींच्या मध्ये एक धागा समान असलेला आढळून येतो तो आहे फक्त भक्तीचा. कारण पूर्वीच्या काळामध्ये स्त्रियांना खूप त्रास होता. त्या रूढी, प्रथा, परंपरा याने ग्रासलेल्या होत्या. त्यातून बाहेर पडण्यासाठी संतांनी खूप प्रयत्न केले. व लोकांना भक्तीसोबतच ज्ञान दिले आणि सर्व समाजाचा उद्धार व्हावा, यासाठी उच्च-नीच, ब्राह्मण-शूद्र, लहान-थोर हे सर्व भेद मिटावीत

म्हणून स्त्री आणि शुद्रांना ज्ञानाचा,भक्तीचा मार्ग मोकळा केला.त्यामुळेच आज आपल्याला ह्या संत साहित्यामध्ये संत कवयित्रीची परंपरा एक वेगळी दिसून येते.

**महाराष्ट्रातील संत कवयित्रींचे वेगळेपण:-**

मराठी गद्य कवयित्री म्हणून पहिला मान मिळाला तो महा नुभाव पंथातील महदंबा त्यानंतर संत कवयित्री म्हणून समोर येतात त्या म्हणजे मुक्ताबाई,जनाबाई,कान्होपात्रा, तुकबाची शिष्या बहिणाबाई, समर्थांची शिष्या वेणाबाई या सर्व प्रमुख संत स्त्रिया असल्या तरी त्या कुठल्यातरी संप्रदायाच्या अनुयायी आहेत. त्यांचा कालखंड जरी भिन्न असला तरी त्याची जाणीव ही एकच होती ती म्हणजे भक्तीची. सर्व संत कवयित्री सर्वसामान्य आहेत. त्यांना कोणतीही श्रेष्ठ अशी परंपरा नाही किंवा खूप संपत्ती प्रांतांचे सुख नाही, प्रतिष्ठा नाही, केवळ कष्ट आणि हाल अपेष्टा त्यांच्या नशिबी आहेत. पण या सर्वांजवळ एकच खूप मोठी शक्ती होती, ती म्हणजे भक्तीची आणि या भक्तीच्या बळावर वारकरी स्त्री संतांनी आपले नाते विठ्ठलाची जोडलेले दिसते. त्यांना त्यांच्या जीवनाला सार्थ करणारा असा विठ्ठल होता. विठ्ठलाची लाभलेली अखंड गुरुकृपा आणि संतांचा सहवास यातच त्यांची भक्ती फुलत गेली बहरत गेली, आणि यातूनच संत कवयित्रींच्या काव्याला वाचा फुटली. त्यातच त्यांचे वेगळेपण दिसून आले.

संत कवयित्रींचे साहित्य आणि जीवन यांचा शोध घेताना साहित्यिक बहुधा असे म्हणतात की, महादाईसा, जनाबाई, मुक्ताबाई यांच्यासारख्या संत कवयित्री ह्या स्त्री-पुरुष चौकटीच्या पलीकडे केव्हाच गेल्या आहेत. त्यांनी घेतलेला मुक्तीचा शोध हा मानवी देहापलीकडला होता. त्यांनी स्वातंत्र्याचा अर्थ आध्यात्मिक पातळीवरून लावतात. ज्या संतांना अध्यात्मिक मोक्षाची आस लागते ते संत सुखदुःखा पलीकडे जाऊन माणसाचे ईश्वराशी असलेले नाते काय आहे ते सांगतात आणि ते अर्थही अलौकिक असतात. म्हणून संत त्यांची सुख दुखे वेदना ह्यांचे एक मोठे दालन प्राप्त झालेले दिसून येते. परंतु समकालीन साहित्यात स्त्री-पुरुष शांतीचे निकष संत साहित्याला लावणे अप्रशस्त ठरेल किंवा असा युक्तिवाद एका अर्थी समजण्यासारखा आहे. पण तरीही असा प्रश्न शिल्लक राहतोच की, जनाबाई, मुक्ताबाई आणि सर्व संत स्त्रिया जर महायोगिनी होत्या, त्यांना जर अष्टसिद्धी प्राप्त झाल्या होत्या तर मग आज त्यांचे स्मरण का ठेवली जात नाही? हे आवर्जून लक्षात घेण्यासारखी बाब आहे. ज्ञानेश्वर एक की दोन ह्या वर सुद्धा वेळोवेळी भरपूर वाद झाले. नामदेवांच्या आणि रामदासांच्या संघटनाचातुर्याच्या गौरवही देखील झाला. तुकारामांच्या अध्यात्मिक साधनेतील सर्व खाचखळग्यांचा तपशिलात अभ्यास झाला. परंतु त्यातले काहीच संत कवयित्रीच्या वाट्याला का आले नाही? चक्रधरांची महादाईसा, नाम्याची जनी,ज्ञानेशाची मुक्ताई,तुकारामाची

बहिणाबाई,रामदासांची वेणाबाई नेमके ही अशीच बिरूदे इतिहासामध्ये का उरली ?ह्या जर महान संतपुरुषांच्या सहवासात आल्याच नसत्या तर ? जे काही लिखित साहित्य त्यांच्या नावावर आहे,त्यापेक्षा अधिक असायला हवे होते. परंतु आज ते काळात हरवत चाललेले दिसते.कवयित्रींनी जरी देहातील पातळीवर स्वातंत्र्याचा व आध्यात्मिक विकासाचा अनुभव घेतला तरी त्यांच्या लिखाणा मधून वेळोवेळी बाईपणाचा दाहक अनुभव हा दिसत जातो.संसारच्या अनुभवाने स्त्री आणि पुरुष संत हे दोघेही संत पोळले गेलेले आहेत. परंतु स्त्रियांच्या लिखाणातून बाईपणाचे त्यांच्यावर झालेले घाव किती खोलवरचे व वेगळे आहे.ते जाणवते म्हणजेच समाजामध्ये त्या काळात संसार करीत निमूट जगणाऱ्या सधवा आणि विधवा स्त्रिया यांची फार कोंडी झालेली दिसते.

साहित्याची परंपरा जरी मोठी असली तरी आपल्यापर्यंत बायकांची जगणे परंपरेतून का पोहोचले नाही? इतकेच नाही तर,मानवी जीवनातील वेगवेगळ्या दालनातील दु:ख अगदी बारकाव्याने नोंदणाऱ्या संतांनीही बाईपणाचे वेगळे दु:ख तितक्या प्रभावपणे मांडले नाही.ह्या संत कवयित्रींचे लेखन वाचल्यावर मनाला जो चटका बसतो तसे लेखन पुरुष संतांनी जीवनाला अपार वेध घेण्याची शक्ती घेऊनही बसत नाही, असे का? आधुनिक काळामध्ये आज एकीकडे खूप प्रगती होत आहे. पण दुसरीकडे बायकांचे जीवन अधिका अधिक कोंडलेले व अर्थहीन असा अनुभव येऊ लागला बहुतेक करून शहरी बायकांचे स्वयंपाक घर माज घराशी नाते तुटलेले दिसते. परंतु त्यांची स्वायत्तता आणि बाहेरच्या जगातही बाई म्हणून अप्रतिष्ठाच वाटायला आली. त्यामुळे बाईपनाच्या अवमूल्यनाचा अनुभव निर्भयपणे मांडण्यास सुरुवात केली. ती बायकांनीच बायका ह्या पुरुषांपेक्षा वेगळ्या असल्या तरी कोणत्याही बाबतीत निसर्गतः त्या कोठेही कमी नाही. म्हणून आपली जी संस्कृती आहे. त्यामध्ये बाईच्या शरीरातील निसर्गाचा मात्र अकारण व सोयीस्कर पणे बागुलबुवा केल्याचे जाणवते. नव्या चळवळीने काही प्रश्न हे विचारलेले दिसतात. शहरी औद्योगिक आणि स्पर्धात्मक वातावरणामध्ये वाढलेल्या उच्च वर्गातील आणि उच्च जातीतील शिक्षित विशेषतः इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधून शिकणाऱ्या स्त्रिया आणि त्यांच्यावर इंग्रजी विद्येचा होणारा प्रभाव यामुळे त्या वेगळ्या प्रकारे विचार करू लागल्या. त्यामुळे नवीन चळवळ महाराष्ट्राची इतिहास परंपरा, संस्कृती या सर्वांपासून दूर आहे. पण बहुसंख्या स्त्रियांच्या जगण्यापासून तर उच्चशिक्षित स्त्रियांचे जग वेगळे आहे. त्यामुळेच बाईची जात म्हणून समान अनुभव जरी घेत असल्या तरी त्या बऱ्याच वेळा एकमेकींपर्यंत पोहोचू शकत नाहीत. कारण खेड्यागावांमध्ये लहानपणीच लग्न होतात. आणि दरवर्षी बाळंत होणाऱ्या आणि निमुटपणे राबणाऱ्या सोशिक अशा बायका संत कवयित्रीच्या साहित्यातून सापडतील असे वाटते कारण संत कवयित्रींची नाळ

ही त्यांच्या भोवताली असलेल्या समाजाशी आणि वास्तवाशी जोडल्या गेलेली आहे.उदाहरणार्थ शूद्र जातीतील दासी जनी हिने समाजामध्ये राहून त्या समाजाला कसा विरोध केला. आणि ईश्वराला,समाजधुरीणांना,समाज सुधारकांना आणि भोवतालच्या समाजाला अतिशय मार्मिक प्रश्न विचारले? भरल्या बाजारी डोईचा पदर खांद्यावर टाकून जाण्याची प्रतिज्ञा करणारी जनाबाई किती आपल्याला अचूक मार्गदर्शन करते, हे दिसून येते. देवाचे देवपण आपल्याच ब ळावर असते. अशी सार्थ जाण आजच्या समाजाला व विशेषतः आपल्या नवऱ्यांना किंवा पुरुषांना देव मानणाऱ्या स्त्रीने का कमावू नये? असा प्रश्न उपस्थित होतो. मुक्ताबाईंनी मिळवलेला स्वातंत्र्याचा देहातील सहजपणा आपण विसरला नाही पाहिजे. कारण आई-बापाविना पारख्या झालेल्या आणि आयुष्यामध्ये वणवण फिरत असलेल्या मुलीने 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळीले सूर्याशी' असा भाव व्यक्त केला आहे .तोच वारसा घेऊन आज आपण आपली नवीन स्त्री  चळवळ का उभी करत नाही?

**संत मुक्ताबाई**

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपान देव यांची एकुलती एक धाकटी बहिण म्हणजे मुक्ताबाई होय. विठ्ठल पंत आणि रुक्मिणी बाई या आपेगावच्या कुलकर्णी दांपत्याचे हे कन्यारत्न सर्व भावंडांमध्ये मुक्ताबाई लहान होत्या.तरी त्यांचा अधिकार मोठा होता. लहान असून देखील 'तुम्ही तरोनी विश्वतारा' असा अलौकिक उपदेश ज्ञानेश्वरांना केला.तर १४०० वर्ष वयाच्या चांगदेवांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. यावरून मुक्ताईचे मोठेपण सहज लक्षात येण्यासारखे आहे. मुक्ताईचा जन्म इ.सवी. सन १२७९ चा आहे. आणि समाधीचा काळ इ.सवी. सन १२९७ हा आहे. अवघ्या अठरा वर्षाच्या आत आपल्या कार्यकर्तृत्वाने भौतिक अस्तित्व संपूनही ती अजरामर झाली. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्यानंतर ती खूप उदास होत गेली, आणि अन्न पाणी वर्ज केले.खानदेशात मेहून येथे तिने आपला देह ठेवला. मुक्ताबाईंची काव्यरचना फार मोठी आहे. त्यांच्या नावावर केवळ ४२ अभंग आहे. पण त्यामध्ये विषयाचे वैविध्य आहे. त्याचा आशय गहन आहे. त्यांच्या अभंगांमध्ये नाममहिमा, गुरुमहिमा, परमार्थाचा उपदेश,आत्मस्थिती पर अभंग असे महत्त्वपूर्ण सांप्रदायिक स्वरूपाचे अभंग आढळतात. उपदेश पर अभंगांमध्ये ताटीचे अभंग विशेष असे महत्त्वाचे आहेत. कारण एका लहान बहिणीने आपल्या वडील बंधू ज्ञानेश्वरांना अधिकार वाणीने उपदेश केलेला दिसून येतो.

**ताटीचे अभंग**

ताटीच्या अभंगाचा एका विशिष्ट प्रसंगातून जन्म झालेला दिसून येतो. कारण रुसून बसलेल्या ज्ञानदेवांना आपल्या कर्तव्याची त्या जाणीव करून देतात. संतांनी समाजाशी ,जगाशी कसे वागावे ,कसा संबंध ठेवावा, कोणत्या प्रकारचा प्रतिसाद द्यावा, हे मुक्ताबाई या

अभंगातून सांगताना दिसतात. खरे तर या अभंगांमध्ये एका बहिणीने भावाचे केलेले एक प्रकारे सांत्वनच आहे. मुळामध्ये मुक्ताबाई ज्ञानदेवापेक्षा खूप लहान आहे. ज्ञानदेव हे एक असामान्य संत आहे.एक देवतुल्य व्यक्तिमत्व पण ते लौकिक पातळीवर देव सुद्धा सामान्य माणसासारखा वागतो, त्याचे हे एक उत्तम उदाहरण. ज्ञानेश्वर लोकनिंदेने व्यथित झाले, दु:खी झाले. ज्ञानेश्वर या संताचा तोल ढळला.तेव्हा ताटीचे अभंगाची निर्मिती झाली . या अभंगातून तिने त्यांना त्यांच्या जीवन कार्याची जाणीवच करून दिलेली दिसते. आणि अशा पद्धतीने मुक्ताईने त्यांना बोध केला. मुक्ताई लहान असून तिच्या अंगी मुळतः मातृत्वाची देणगी होती. त्यामुळे ती मोठ मोठ्या संतांना समजून सांगू शकत होती.एकाच वेळी बालिश आणि एकीकडे प्रौढ मुक्ताबाई ही आपल्याला तिच्या कार्यातून दिसते. नामदेव आळंदी मध्ये आले असतांना निवृत्ती ज्ञानदेव व सोपान या तिघांनी त्यांना प्रेमाने वंदन केले. पण नामदेवाने अहंकारामुळे त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. त्यामुळे मुक्ताबाईला ही गोष्ट खटकली. त्यामुळे ती नामदेवाला नमस्कार करावयास पुढे आली नाही. नामदेव हा फक्त श्रेष्ठ भक्त आहे. आणि त्याचे पाय धरणे उचित आहे. असे निवृत्तीनाथांनी समजावूनही ती नमस्कारासाठी उठली नाही. त्याप्रसंगी मुक्ताबाईंनी धैर्य व बुद्धिमत्तेची चुणूक दाखवलेली दिसते. चांगदेव व नामदेव त्यांच्या अंगी असलेल्या अहंभावाचा त्याग त्यांना करावा लागेल. नामदेवांच्या अहंकाराचा फुगा तिनेच फोडला.

**'ताटी उघडा ज्ञानेश्वरा!'**
**म्हणून साद घालतांना**
**'विश्व रागे झाले वही!'**
**संत सुखे पाणी!!'**

अशा प्रेमळ आणि कणखर अधिकार वाणीने ज्ञानेश्वरांना उपदेश केलेला दिसून येतो. कधी नव्हे ते ज्ञानेश्वरांना मांडे खाण्याची इच्छा झाली टी इच्छा ज्ञानेश्वरांची आई होऊन मुक्ताईने पूर्ण केली. ती आपल्या एका अभंगामध्ये म्हणते 'अखंड जयाला देवाचा शेजार! कारे अहंकार नाही गेला?' म्हणून काहीशा खट्याळ पण परखडपणे त्यांनी नामदेवाची उणीव दाखविली गोरोबाच्या मडक्याचे थापटणे नामदेवाच्या डोक्यावर आपटून मार्गातल्या अधिकारी चांगदेवांची गुरु म्हणून ती अधिकारीनी झाली.निवृत्तीनाथांना हे सगळे आठवले.आणि अशी नामदेवाची ती प्रतारणा करते. लहानशी मुक्ताबाई जरी असली तरी तिला महान संत असे म्हटलेले दिसते. कारण तिचे व्यक्तिमत्व महान होते. तिने नामदेव चांगदेवांसारख्या संतांना ताळ्यावर आणले एकूणच मुक्ताईच्या अभंगातून स्त्री स्वभावाचे मार्दव, ममत्व, जिव्हाळा, प्रेमळपणा, निरागसता, परखडपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष लक्षात येतात. काहीशा

खट्याळ पण परखडपणे त्यांची मी पणा दाखविणाऱ्या आणि गोरोबांच्या मडक्याचे थापटणे नामदेवाच्या डोक्यावर आपटणे आणि त्यांना कच्चे मडके म्हणणे असे नेमकेपणाने त्यांनी योग मार्गातल्या अधिकारी सामदेवाची गुरु म्हणून ती अधिकारी झाली निवृत्तीनाथांना हे सगळे आठवले आणि

**निवृत्ती राज म्हणे आता पंढरीनाथा!**

**मुक्ताईला जपा अवघेजण!!**

**वेधली चित्तवृत्ती स्वरूपी निमग्न!**

**नाही देहभान मुक्ताईला!!**

आणि अशा व्याकुळ अवस्थेत सर्वांना सोडून मुक्ताईचे प्राण तिच्या देहातून मुक्त झाले नामदेव त्या प्रसंगाचे वर्णन करतात

**कडाडली वीज निरंजनी जेव्हा!**

**मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली!!**

अशी अभंगाची रचना मुक्ताबाईंनी केलेली दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची:**

1. तारा भवाळकर.,(२०१२) “स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर”
2. प्राचार्य डॉ.एस,एस,गाठाळ.,(२०१७) “भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन"
3. संपा.विद्युत भागवत.,(२०१३) “स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन"
4. संपा.डॉ.ताहेर एच.पठाण, डॉ.न. ब.कदम.,(२०१७) “संत साहित्य मीमांसा" (भाषा, संप्रदाय आणि संशोधन)